


**About Us:** http://www.galaxyimrj.com/about-us/
**Archive:** http://www.galaxyimrj.com/archive/
**Contact Us:** http://www.galaxyimrj.com/contact-us/
**Editorial Board:** http://www.galaxyimrj.com/editorial-board/
**Submission:** http://www.galaxyimrj.com/submission/
**FAQ:** http://www.galaxyimrj.com/faq/

# १९८० नंतरची आदिवासी कादंबरी : स्वरूप आणि वैशिष्ट्ये

**डॉ. सुधीर बब्रुवान मोरे**
सहायक प्राध्यापक (मराठी),
वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर.

## १. प्रास्ताविक :

इ.स.१९६० नंतर विविध वाङ्मयीन चळवळी होऊन त्यातून नवे वाङ्मय प्रवाह उदयास आले. यामध्ये दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य, जनसाहित्य, ख्रिस्ती मराठी साहित्य, मुस्लिम मराठी साहित्य आदींचा उल्लेख करावा लागतो. या वाङ्मयीन चळवळी अगोदरच्या साहित्याला वाङ्मयीन, सामाजिक-सांस्कृतिक भूमिकांना विरोध करत निर्माण झाल्याचे आपल्याला दिसून येते. अशा चळवळीतून साहित्यिकांच्या दृष्टीला नवे आयाम प्राप्त होतात. वास्तवाचे नव्याने दर्शन घडते, आकलन होते. सर्व चळवळींनी व्यक्ती जीवनापेक्षा समाजजीवनाला अधिक महत्त्व दिले. त्यामुळे समाजकेंद्री अनुभव महत्त्वाचा ठरला. साहित्याचे प्रयोजन हे केवळ मनोरंजन करणे किंवा आनंद मिळविणे हा नसून समाजात काही एक परिवर्तन घडवून आणले पाहिजे, हा आहे.

साठोत्तरी कालखंड हा परिवर्तनाचा काळ म्हणून ओळखला जातो. गेल्या चार दशकांपासून आदिवासी साहित्य चळवळीची वाटचाल आपणास पाहायला मिळते. आदिवासी साहित्य हे रानावनातील वंचितांचे, वनसंस्कृतीच्या उपासकांचे साहित्य आहे. या वनसंस्कृतीच्या उपासकांना इथल्या व्यवस्थांनी नेहमीच सावत्रपणाची वागणूक दिली आहे. त्यामुळे या साहित्यात आदिम वेदनेचे, जाणिवेचे चित्रण आलेले दिसून येते.

इ.स. १९७५ नंतर खऱ्या अर्थाने आदिवासी साहित्याची चळवळ सुरू झाली. विषमतेने ग्रासलेले जीवन, शोषण, अन्यायी व्यवस्थेविरुद्ध मनात असणारी चीड याबाबत नवशिक्षित आदिवासी युवकांनी साहित्याच्या रूपाने अभिव्यक्ती करायला सुरुवात केली. सर्व साहित्यप्रकारातून ही निर्मिती होत होती; मात्र अभ्यासाच्या सोयीसाठी या ठिकाणी आपण आदिवासी कादंबरीचा अभ्यास करणार आहोत. तत्पूर्वी आदिवासी साहित्याचा धावता आढावा घेणार आहोत.

## २. आदिवासी साहित्य

आदिवासी साहित्यातून आदिवासींचे विविधांगी जीवनचित्रण कथा, कादंबरी, कविता, नाटक आदी वाङ्मयप्रकारातून समोर येत आहे. पर्यावरणाशी एकरूप झालेले आदिवासी, त्यांचे धार्मिक,सामाजिक जीवन, प्रथा-परंपरा, श्रद्धा-अंधश्रद्धा, नीतीमूल्ये या साऱ्यांचे वास्तवदर्शी चित्रण आदिवासी लेखक मांडत आहेत. आज औद्योगिकीकरण, विकास याच्या नावाखाली इथला निसर्गनिष्ठ आदिवासी एका नव्या संघर्षात सापडला आहे. इथल्या काही तरुणांना बाहेरचे जग खुणावते आहे; मात्र आपली मूळे त्यांना त्यांची जाणीव करून देताना दिसत आहेत. बारमाही असणारे दारिद्र्य, निरक्षरता, व्यवस्थेकडून होणारे शोषण, माणूसपणासाठी करावा लागणारा संघर्ष हे आदिवासी लेखकांचे संवेदनक्षेत्र बनले आहे.

कविता हा अत्यंत दाहक अनुभव थेटपणे मांडणारा वाङ्मयप्रकार आहे. आदिवासी कविता खऱ्या अर्थाने १९८० नंतर उदयास येऊ लागली. आदिवासी कवींनी आपल्या अस्सल अनुभूती कवितेतून मांडल्या आहेत. यामध्ये पहिल्या पिढीतील वाहरू सोनवणे, भुजंग मेश्राम, विनायक तुमराम, उषाकिरण आत्राम, दशरथ मडावी, बाळ तिरणकर, उत्तम धोंगडे, माधव सरकुंडे, विनोदकुमार उइके, वामन शेडमाके, सुभाष आडे आदींचा समावेश होतो. तर पुढच्या पिढीतील सुनील कुमरे, कुसुम आलाम, कविता आत्राम, ब्रह्मानंद मडावी, पितांबर कोडापे, वसंत कन्नाके, सुरेंद्र मसराम, लक्ष्मण टोपले, कवडू आत्राम आदी कवींचा उल्लेख करावा लागेल.

कवितेपेक्षा कथात्म आदिवासी साहित्याची निर्मिती तुलनेने कमी झाल्याचे दिसते. याची कारणे वेगवेगळी असतील मात्र आदिवासी कवितेचा स्वर हा अधिक टोकदार झाला आहे. त्याचबरोबर संख्यात्मकदृष्ट्या ही कविता मोठ्या प्रमाणावर निर्माण झाली.

आदिवासी नाटक आणि एकांकिकांचा मराठीत आजही दुष्काळ आहे. बोटावर मोजण्या इतकीच नाटके, एकांकिका पाहायला मिळतात. व्ही. आर. पाकलवार यांचे 'मरीमायचा भुत्या', गणपती वडपल्लीवार यांचे 'मातामाईचा मुंज्या', विनोद मोरांडे यांचे 'स्पेशल ॲक्शन प्लॅन' आणि 'आत्मसमर्पण', दशरथ मडावी यांचे 'बिरसा मुंडा', पुरुषोत्तम शेडमाके यांचे 'स्वातंत्र्य शहीद रणसूर्य शेडमाके', श्री.तोडसाम यांचे 'सोनेताकुर्स', कुंडलिक केदारी यांची 'आली रंगात राणी', 'आक्रोश'आणि 'कथा इंद्रपुरीची' या नाटकांचा समावेश होतो. या नाटकांना आदिवासी जीवनाचे सामाजिक संदर्भ आहेत.

कथा-कादंबरी हा वाङ्मयप्रकार मराठी साहित्यात विपुल प्रमाणात निर्माण झाला आहे, मात्र आदिवासी कथात्म वाङ्मयप्रकार अत्यंत कमी प्रमाणात हाताळले गेले आहेत. आदिवासी कथेकडे कथाकारांचे अजूनही

म्हणावे तितके लक्ष गेलेले नाही. उषाकिरण आत्राम (अहेर), माधव सरकुंडे (सर्वा, ताडम) असे मोजकेच कथासंग्रह दिसून येतात. आदिवासी कादंबरीचा विचार करता कथेच्या तुलनेत कादंबरी बऱ्या प्रमाणात लिहिली गेली असून याचा विस्तृत विचार आपण पुढीलप्रमाणे करणार आहोत.

### ३. आदिवासी कादंबरीचे स्वरूप

विस्तृत भाषिक अवकाश आणि प्रदीर्घ स्वरूपाच्या जीवनावकाशाची क्षमता व भवतालाच्या बदलांना कवेत घेण्याची क्षमता असल्याकारणाने कादंबरीसारखा साहित्यप्रकार वेगळेपणाने पुढे येतो. कादंबरी ही अनेक कथासूत्र, पात्र आणि आशयसूत्रांना आपल्यामध्ये सामावून विकसित होताना दिसते. हा साहित्यप्रकार एकाच वेळी वास्तव आणि कल्पित अशा दोन परस्परविरोधी ध्रुवांद्वारे आकार घेतो. त्यामुळे कादंबरीतील वास्तव आणि कल्पना, व्यक्ती आणि समाज अशा परस्परविरोधी घटकांच्या माध्यमातूनच कादंबरीची होणारी निर्मिती ही वेगळी आणि नावीन्यपूर्ण होते.

आदिवासी कादंबरीचा विचार करताना, आदिवासी कादंबरी ही संख्यात्मकदृष्ट्या कमी आहे मात्र गुणात्मकदृष्ट्या तिची दखल घेणे भाग आहे, गरजेचे आहे. आदिवासीतरांचे कादंबरीलेखन आणि आदिवासींचे कादंबरीलेखन अशा दोन भागांमध्ये तिचा विचार करावा लागेल.

१९४५ नंतर आदिवासी जीवनावर काही कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. या कादंबऱ्यांमध्ये आदिवासींचे जीवन वास्तवपणे चित्रीत करण्याचा प्रयत्न आदिवासीतर कादंबरीकरांनी केला आहे. याचा थोडक्यात आढावा या ठिकाणी घेतला जाणार आहे.

आदिवासी कातकरी जीवनावरील शं. रा. भिसे यांची 'जंगलातील छाया'(१९४५) ही सुरुवातीची महत्त्वपूर्ण कादंबरी. या कादंबरीत भिसे यांनी मानवतेला साद घातली आहे. वि.वा.हडप यांची 'गोदाराणी' ही कादंबरी ठाणे जिल्ह्यातील वारली जमातीवर सावकार, जमीनदार यांनी केलेल्या अन्यायविरुद्ध वारली लोकांनी केलेल्या संघर्षाचे चित्रण करते. किसान सभा आणि लाल बावट्याची चळवळ यांच्या रेट्यामुळे वारली समाजात झालेली जागृती परिणामकारकपणे मांडली आहे.

'वाडगीण'(१९५१) ही वा.ब. कर्णिक यांची वारली जमातीतील मायलेकाच्या केविलवाण्या जगण्याचे, त्यांच्या संघर्षाचे दर्शन घडविणारी कादंबरी आहे. 'महानदीच्या तीरावर'(१९५३) ही दुर्गा भागवत यांची गोंड जमातीवरील कादंबरी. छत्तीसगडमधील रायपूर जिल्ह्याच्या परिसरातील गोंड जमातीमध्ये असणाऱ्या अंधश्रद्धा, रूढी-परंपरा, भूतबाधा, जादूटोणा, मांत्रिक-भगत या खोलवर रुजलेल्या रुढीवर दुर्गा भागवतांनी अभ्यासपूर्ण

मांडली केली आहे. गोंडांचे सांस्कृतिक, भावनिक अंतरंग याला कुठलाही उणेपणा येऊ न देतात दुर्गा भागवत यांनी ते मांडले आहे.

गो.नि. दांडेकरांची ‘जैत रे जैत’(१९६५) ही ठाकर आदिवासी जमातीवरील कादंबरी होय. ठाकरांचे पारंपरिक जीवनदर्शन दांडेकरांनी चित्रित केले आहे. यातून ठाकरांची भटकंती, त्यांचे साहस दिसून येते. दांडेकरांनी ‘भिल्लवीर कलिंग’ ही कादंबरी लिहून कलिंगाच्या स्वभाव वैशिष्ट्यांचे, सहसाचे चित्रण केले आहे.

र.वा. दिघे यांनी ‘सराई’ या कादंबरीतून कातकरी आदिवासी बांधवांचे कष्टमय जीवन चित्रीत केले आहे. श्रीराम अत्तरदे यांनी ‘सावलीच्या उन्हात’ या कादंबरीतून भिल्ल, पावरा, महादेव कोळी अशा आदिवासी जमातींच्या जनजीवनावर प्रकाश टाकला आहे. नलिनी सहस्रबुद्धे यांनी गडामंडल्याची गोंड राणी दुर्गावती हिच्या जीवन संघर्षाची कहाणी कादंबरीमध्ये चितारली आहे. नरेश दलपतशहा याची पत्नी असणारी राणी दुर्गावती ही त्याच्या शौर्यावर भाळून त्याच्याशी लग्न करते पण दलपदशहाच्या अकाली निधनाने एक पोकळी निर्माण होते. त्यातून संपूर्ण राज्याचा भार राणी दुर्गावतीवर पडतो.

दादा देशकर यांची ‘न्यायदंड’ ही आदिवासींच्या खून खटल्यावर आधारित कादंबरी. या कादंबरीत आदिवासींवरील अन्यायाचे खटले कशा पद्धतीने चालवले जातात याचे चित्रण येते. दीनानाथ मनोहर यांनी ‘आंदोलन’ या कादंबरीतून भिल्ल, पावरा या जमातींच्या संघटनांनी केलेल्या प्रखर आंदोलनाचे चित्रण केले आहे. हे आंदोलन आदिवासींच्या आर्थिक शोषणाविरुद्ध पुकारलेले होते. यातून आदिवासींच्या जीवनाचे अंत:प्रवाह उलगडून दाखविले आहे.

मधुकर वाकोडे यांची ‘झेलझपाट’ ही प्रसिद्ध असलेली आदिवासी कादंबरी. या कादंबरीतून आपला स्वार्थ साधणारे सावकार-व्यापारी आणि भोळेभाबडे कोरकू आदिवासी यांचे चित्रण केले आहे. या कादंबरीमध्ये केरू आणि फुलय यांची प्रेमकथा दिसून येते, पण त्याच्याही पलीकडे जाऊन कोरकू आदिवासींचे शोषण करणारी व्यवस्था जास्त ठळकपणे दिसून येते. सुरेश द्वादशीवार यांनी ‘हाकूमी’ या कादंबरीतून गडचिरोली जिल्ह्यातील उच्चशिक्षित तरुणाच्या पुढाकाराने आलेली परिवर्तनाची पहाट चित्रीत केली आहे. विलास मनोहर यांनी ‘एका नक्षलवाद्याचा जन्म’ ही कादंबरी लिहून नक्षलवादी जीवन चितारले आहे. नक्षलवाद्यांवरतीच एकनाथ साळवे यांनी ‘एन्काऊंटर’ ही कादंबरी लिहिली आहे. या दोन्ही कादंबऱ्यांमधून नक्षलवादी कसे निर्माण होतात, त्यांचे हेतू कोणते, हिंसा का घडते या साऱ्या प्रश्नांची उकल करण्याचा प्रयत्न केला आहे.

वरील सर्व कादंबरीकारांनी आपल्या कादंबऱ्यांमधून आदिवासी जीवन चित्रण प्रामाणिकपणे चितारण्याचा प्रयत्न केल्याचे आपल्याला दिसून येते. आदिवासी जगण्याचा अनुभव जरी नसला तरी आदिवासी जगण्याची असणारी अनुभूती त्यांच्या प्रति होती, त्यामुळे आदिवासी जीवन वास्तवाच्या अगदी जवळ गेल्याचे आपल्याला दिसते. हे खरे आहे की, मूळ आदिवासी असणारा लेखक ते जगणे अतिशय टोकदारपणे लिहू शकतो मात्र या कादंबरीकारानी आपली अनुभूती वाचकापर्यंत पोहोचवण्यात नक्कीच यशस्वी झालेत, असे या ठिकाणी म्हणावे लागेल.

आदिवासींचे कादंबरीलेखन पाहत असताना नजूबाई गावित, माधव सरकुंडे, बाबाराव मडावी, दीपक वळवी, विनोद कुमरे, कृष्णा भवारी आदी कादंबरीकरांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास करावा लागेल.

नजुबाई गावित हे आदिवासी कादंबरीतील एक ठळक नाव. साम्यवादी आदिवासी कार्यकर्त्या असणाऱ्या नजुबाई गावित यांनी 'तृष्णा' नावाची पहिली कादंबरी लिहिली. ही कादंबरी आदोर, रोप, रोपणी व पारोळ या चार खंडात विभागली आहे. मावची आणि भिल्ल या दोन जमातीवर ही कादंबरी बेतलेली असून या लोकांचे लोकजीवन,लोकरूढी, लोकांच्या लग्नप्रथा, व्यसने, सण-उत्सव, बऱ्या वाईट प्रवृत्ती, दैन्य-दारिद्र्य याचे सूक्ष्म निरीक्षण नजुबाई गावितांनी केले आहे.

प्रा. माधव सरकुंडे यांनी 'वाडा' ही कादंबरी लिहून आदिवासी समाजातील 'आंध' जमातीच्या बोलीतील ही कादंबरी आहे. आंध समाज हा अनेक व्याधींनी गुरफटलेला आहे. त्याचा गैरफायदा गावातील पाटील कशा पद्धतीने करून घेतो याचे चित्र कादंबरीत आले आहे. आंध जमातीत अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणावर असल्याचे दिसून येते. करणी, भानामती, देवदेवतांची पूजाअर्चा, त्यासाठी करावे लागणारे अघोरी कृत्य या सर्व कुप्रथांचे दर्शन कादंबरीभर दिसून येते.

बाबुराव मडवी यांनी 'टाहो' ही कादंबरी लिहून सावकार-जमीनदारांच्या तावडीत सापडलेल्या आदिवासींचे चित्र रेखाटले आहे. आपली अस्मिता, अस्तित्व यासाठी कादंबरीचा नायक असणारा भीमा आदिवासींना कशाप्रकारे प्रोत्साहन देतो याचे चित्र कादंबरीत येते. आदिवासींना मारझोड करून त्यांच्याकडून काम करून घेणारा गावातील जमीनदार , परजातीतील मुलाशी लग्न केल्यामुळे वाळीत टाकलेली मैना, अंगात भिवसन देव येणारा साधू कादंबरीतून प्रकर्षाने येतात.

'पाड्यावरचा टिल्या' ही तुकाराम चौधरी यांची आदिवासी शेतकऱ्याची व्यथा सांगणारी कादंबरी. या कादंबरीत आदिवासी समाजातील मुलांचे शिक्षण केंद्रस्थानी ठेवून तिथल्या जीवन पद्धतीचा परामर्श

सविस्तरपणे घेतलेला आहे. आदिवासी साहित्य लेखनातील महत्त्वाचे समीक्षक आणि कवी विनोद कुमरे यांनी 'कोयतूर' या कादंबरीतून आदिवासी गोंड समाजाचे जीवनचित्र रेखाटले आहे. आदिवासी समाजातील समस्या, प्रश्न या कादंबरीतून उजागर केलेले आहेत. शोषित आणि वंचित आदिवासी समाज या ठिकाणी अधोरेखित होतो.

सामाजिक बांधिलकीच्या लेखनाने उपस्थित होणाऱ्या प्रश्नांची नोंद आपल्या अभिव्यक्तीतून या ठिकाणी घेतलेली आहे. आदिवासी कादंबरीतून आलेल्या चित्रणाबाबत प्रा. सुनील पखाले निरीक्षण नोंदवतात ते असे, 'आदिवासी कादंबरीने पोटासाठी श्रम करणाऱ्या उपेक्षित दुर्लक्षित माणसाला कलेचा नायक बनवून प्रस्थापितांच्या बोथट संवेदनांना नवे भान दिले आहे'[१] आदिवासी जीवनातील वर्तमान समस्यांची गुंतागुंत आणि व्यामिश्रता या कादंबऱ्यांनी बऱ्याच अंशी ताकदीने व्यक्त केली आहे. आदिवासी जमाती व प्रदेश कोणतेही असले तरी त्या जीवनाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन महत्त्वाचा आहे. आदिवासी कादंबऱ्यांच्या वैशिष्ट्यांचा, वेगळेपणाचा, वैविध्यपूर्ण आशयाचा आढावा पुढे घेतला जाणार आहे.

**४. आदिवासी कादंबरीची वैशिष्ट्ये**

आदिवासी कादंबरीकारानी प्रत्यक्ष जीवन अनुभवल्यामुळे आदिवासी समाजाला जे भोगावे लागले आहे, त्याची अनुभूती असल्याने कादंबरीतील चित्रण हे वास्तवदर्शी ठरले आहे. उपेक्षित, दुर्लक्षित असणारा आदिवासी समाज, त्यातील विविध जमातीच्या अन्यायाविरुद्धच्या आवाजाचा अविष्कार झाल्याचे दिसून येते.

आदिवासी कादंबरीतून आदिवासी समाजातील नीतीमूल्ये, प्रथा-परंपरा, संस्कृती या सर्वांचे वर्णन आलेले आहे. त्याचबरोबर आदिवासी कादंबरीतून आदिवासी समाजाचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय परिस्थितीचे चित्रण आल्यामुळे या सर्व परिस्थितीचे वाचकांना आकलन होते.

आदिवासी कादंबरीने मराठी कादंबरीतील अनुभवविश्वापेक्षा अतिशय वेगळा अनुभव वाचकांना दिला आहे. जंगल, दुर्गम दऱ्याखोऱ्या, डोंगर, जंगलात राहणारी श्वापदे या साऱ्यांचे पदर उलघडून दाखविले आहेत.

आदिवासी बोली भाषेचा चपखलपणे उपयोग करून कादंबरीकारानी कादंबरीत चैतन्य निर्माण केले. याबाबत डॉ. प्रमोद मुनघाटे म्हणतात, 'बोलीभाषेचे प्रयोग, देशी परिसर मूळ गुणसूत्रांसह उभा करण्याचे कौशल्य, जोरकस देशीय प्रतिक्रिया, निवेदनशैलीचे प्रवाहित्व, प्रतिके प्रतिमांचा अनुचित वापर, आध्यात्मिक परिणामांचा वापर, वैशिष्ट्यपूर्ण शब्दांची पुनरुक्ती अशा अनेक अंगांचा वैशिष्ट्यपूर्ण उपयोग दिसून येतो.'[२] बोली भाषेच्या चपखल वापरामुळे एक वेगळा अनुभव मिळतो.

**५. सारांश**

सध्याच्या काळात आदिवासी संस्कृतीचा शहरी संस्कृतीशी होणाऱ्या संपर्कामुळे काही प्रमाणात गुंतागुंत निर्माण होताना दिसत आहे. या दृष्टीने आदिवासी कादंबरीत काही मौलिक विषय येणे अपेक्षित आहे. त्यातून आदिवासींच्या सामाजिक, भौगोलिक विस्थापनाचे असणारे प्रश्न अधोरेखित होऊ शकतात. हवा, पाणी, अन्न, जमीन व अन्य नैसर्गिक साधनं टिकली तर माणसं टिकणार ! माणसं जगली तर माणसाची बुद्धी नवीन शोध लावणार. निसर्गाला वगळून जीवन जगता येणार नाही, हे सत्य आहे आणि आदिवासी साहित्य हेच दाखवून देत आहे.

**संदर्भग्रंथ:**

**१)** सुनील पखाले, आदिवासी मराठी कादंबरी: देश्य दृष्टीक्षेप, प्रमोद मुनघाटे (संपा), आदिवासी मराठी साहित्य : स्वरूप आणि समस्या, प्रतिमा प्रकाशन, पुणे,२००७, पृ. १११

२) प्रमोद मुनघाटे (संपा), आदिवासी मराठी साहित्य : स्वरूप आणि समस्या, प्रस्तावना, प्रतिमा प्रकाशन, पुणे,२००७, पृ.१४.